Maharashtra Mandal
mmla
Los Angeles



नमस्कार मंडळी,

आम्ही  अशी आशा करतो की आपल्याला दिवाळीचा कार्यक्रम आवडला असेल. हा २००६ च्या समितीचा शेवटचा कार्यक्रम, आता आपली भेट पुढच्या वर्षी. या वर्षीसाठी तुमचा निरोप घेण्यापूर्वी २००६ च्या कार्यक्रमांचा आम्ही आढावा घेऊ इच्छितो.

आढाव्याला सुरुवात करण्यापूर्वी, तुम्ही आम्हाला जो प्रचंड प्रतिसाद दिलात, जे खूप सहकार्य केलंत, त्याबद्दल आम्ही सर्वजण आपले मनापासून आभार मानतो. आपल्या सहकार्याशिवाय आम्ही चांगले कार्यक्रम तर दूरच, चांगले कार्यक्रम करण्याचा प्रयत्नसुद्धा करू शकलो नसतो.

तुम्हाला आठवतच असेल, आपला पहिला  कार्यक्रम झाला तो सक्रांतीचा. ह्या कार्यक्रमामध्ये आम्ही शब्दवेध, फॅमिली फ्युड अशा नविन स्पर्धा  व लोकाग्रहास्तव अंताक्षरी पुन्हा आयोजित केली होती. अगदी खरं सांगायचं झालं तर, हा कार्यक्रम पाहिजे तितका रंगला नाही. असे असूनही बऱ्याच लोकांनी आमचा नविन काहीतरी करण्याचा प्रयत्न वाखाणला. हे प्रोत्साहन आमचा हा वर्षातला पहिला कार्यक्रम असल्याने  महत्वपूर्ण ठरले.

आपला दुसरा कार्यक्रम क्रीडा दिन, नेहमीप्रमाणेच जोरदार झाला. कॅरम, बुद्धिबळ, टेबल टेनिस हे आपल्याला आवडणारे खेळ तर होतेच, पण ह्यावर्षी स्त्रियांच्या स्पर्धासुद्धा अतिशय देखण्या झाल्या. एरवी आम्ही अशी कुजबुज ऐकली होती की क्रीडा दिनामध्ये बायकांना जास्त मजा करता येत नाही, पण या वेळेस जिथे त्यांचा कार्यक्रम आयोजित केला होता त्या खोलीतून त्या बाहेर यायला तयार नव्हत्या.

नंतरचा कार्यक्रम म्हणजे बे एरीयाने सादर केलेलं मराठी नाटक. आता नाटक किंवा कुठलीही कलाकृती म्हटली की मतभिन्नता ही असतेच पण जास्त प्रतिक्रीया या अनुकूलच होत्या. असे म्हणायला हरकत नाही, की नाटक बहुतांशी लोकांना आवडले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रतिसाद. कुणीतरी आम्हाला म्हणालं की मंडळाच्या संपूर्ण इतिहासात एवढे लोक कधी नाटक पहायला आले नव्हते. सीमा कर्णिक (नाटकाच्या लेखिका व दिग्दर्शिका ) यांनीही एल् ए चे प्रेक्षक हे बे एरीयातील प्रेक्षकांपेक्षाही दिलदार असल्याचे बोलून दाखविले.

या नंतरच्या कार्यक्रमाचे सूर अजूनही तुमच्या कानात रुंजी घालत असतील. हा कार्यक्रम तुम्हा आम्हाला एक सुखद अनुभव देऊन गेला याचे सारे श्रेय गोपाळ मराठे व त्यांच्या कलाकार चमूला जाते. हा कार्यक्रम त्यांनी मंडळाकरता केला या बद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. सूरांची जाण असलेल्या व नसलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या लोकांना हा कार्यक्रम खूपच आवडला, अशा प्रतिक्रीया बऱ्याच लोकांनी व्यक्त केल्या.

त्यानंतर आला तो ‘गणपती बाप्पा मोरया’. ह्यावर्षी गणेशोत्सव पण खूप छान झाला. कार्यक्रम मध्यवर्ती सनातन धर्म मंदिरात असल्याने प्रचंड प्रमाणात लोक दर्शनाला आले. कार्यक्रमाला ६५० पेक्षा जास्त लोक आले होते. आरती आणि प्रसादानंतर एक लहान व एक मोठा असा मिळून एक छोटा पण खूपच सुबक आणि देखणा कार्यक्रम झाला. विसर्जनाच्या दोन्ही बसेस मुंबईच्या लोकल ट्रेन प्रमाणे तुडुंब भरल्या होत्या. अतिशय उत्साहात, वाजत गाजत, लेझिमच्या तालावर श्रीगणेशाचे विसर्जन झाले.

दिवाळीच्या कार्यक्रमाच्या आपल्या स्मृती अजूनही ताज्या असतील. ‘टांग टिंग टिंगाक टांग टिंग टिंगा’ करणाऱ्या मोरुच्या मावशीला लोकांनी अक्षरश: डोक्यावर घेतले. सर्वच कलाकारांनी

खूपच मेहनत केली होती आणि रसिक प्रेक्षकांनी त्यांना प्रतिसादही खूप दिला.



हे संपूर्ण वर्षच आमच्या दृष्टीने फार छान गेलं. पूर्ण वर्षाचा सारांश घ्यायचा झाला तर सर्वच कार्यक्रम नीटनेटके झाले असे म्हणावे लागेल. मागील वर्षापेक्षा जास्त लोक सभासद झाले, जास्त प्रतिसाद मिळाला, आयोजनही जास्त चांगले झाले. तुमच्या सारखे रसिक आणि प्रोत्साहन देणारे सभासद मिळाल्यामुळे, पुढील वर्ष अधिक चांगले जाईल अशी आम्हाला खात्री वाटते.

टॅक्स भरायची वेळ जवळ आली आहे. आपलं मंडळ ‘ना नफा’ तत्वावर चालणारी संस्था असल्याने, देणगी दिल्यास तुम्हाला कर सवलत तर मिळेलच, पण आम्हीही अधिक दर्जेदार कार्यक्रम करु शकू. प्रत्येक देणगीदारास आम्ही कायदेशीर पावती, करसवलतीस आवश्यक कागदपत्रे तत्परतेने देऊ.

पुन्हा एकदा आपले मनःपूवक आभार.

आपले नम्र,
आशिष महाबळ, अतुल रिसवाडकर, माना घैसास, राजेश राणे, सौरभ ओक, सौरभ देशपांडे, वैभव समुद्र, युवराज जोशी
२००६ समिती,
महाराष्ट्र मंडळ, लॉस एंजिल्स